**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **स्वामित्व योजनेअंतर्गत ६५ लाख प्रॉपर्टी कार्डांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने वितरण, नागपूरच्या लाभार्थ्यांशी साधला संवाद.**
2. **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांना करणार संबोधित.**
3. **मुंबईत विविध सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांसाठी एकच तिकीट वापरता येणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यात यशस्वी चर्चा.**
4. **नागपूर इथं 20 ते 22 जानेवारी दरम्यान जागतिक पशुआहार शास्त्र परिषद आणि भव्य प्रदर्शनीचे आयोजन, परदेशातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र देखील होणार.**

---------------------------

**स्वामित्व योजना- पंतप्रधान**

**स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्डाचं वितरण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतील ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् पंतप्रधानांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी पंतप्रधानांनी ठिकठिकाणच्या लाभार्थ्यांशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधला. यात नागपुरातील रोशन पाटील यांच्यासोबत पंतप्रधानांनी संवाद साधला...**

***स्वामित्व योजना का कार्ड मालमत्ता पत्रक ये सारी गतिविधि का आपको संबंध कैसे आया, कैसे मिला और इससे क्या आगे फायदा हुआ? सर, मुझे स्वामित्व कार्ड जब से मिला तब तो मैं उस पे लोन ले पाया पहले सर लोन नहीं मिलता था मेरे घर में मतलब बड़ा घर है पुराना बड़ा घर है गांव में तो प्रॉपर्टी कार्ड होने से मुझे लोन मिल पाया सर, मैंने बैंक से 9,00,000 रुपए का लोन लिया और उस पैसों से कुछ पैसों से घर बनवाया है सर और कुछ पैसों से खेती में सिंचाई का साधन किया, उससे सर मेरा फसल बढ़ गया और आमदनी भी बढ़ गई अभी तो***

*सर तीन फसल होती है और अच्छा खासा मतलब प्रॉफिट भी हो जाता है सर, खेती से.*

नागपूरातील वनामती सभागृहात आयोजित कार्यक्रमांमध्ये रोशन पाटील या लाभार्थ्यांनी पंतप्रधानांनी संवाद साधल्यानंतर प्रतिक्रिया देतांना सांगितले की पंतप्रधानांनी मराठीत आमच्याशी संवाद साधला ही आमच्यासाठी नशिबाची गोष्ट होती. स्वामीत्व योजनेअंतर्गत भुमी लेख कार्यालयाकडून आपल्याला सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात आले आणि कर्ज प्रक्रिया सुद्धा सहजरीत्या झाली त्यामुळे मला माझा कृषी व्यवसाय वा�वता आला अशी भावना पाटील यांनी व्यक्त केली. स्वामीत्व व्यतिरिक्त उज्वला, आयुष्यमान भारत, किसान समृद्धी योजना सारख्या योजनांमुळे सुद्धा आपल्याला फायदा झाला असल्यचा त्यांनी यावेळी सांगितलं. या कार्यक्रमाला राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. राज्यातील 15000 गावांमध्ये पहिल्या चरणामध्ये लोकांना आपल्या संपत्तीचे मालक होण्याची संधी प्रॉपर्टी कार्डच्या माध्यमातून मिळणार असून याद्वारे त्यांना शासकीय योजना कर्ज घेण्यासाठी सोयीस्कर जाईल अस बावनकुळे यांनी या कार्यक्रमापूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना स्पष्ट केल.

---------------------------

स्वामित्व योजना विदर्भ

मिळकत पत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) मिळणे आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. या योजनेची सुरुवात महाराष्ट्रातल्या मोजा सोनोरी तालुका पुरंदर येथून झाली आहे. याची दखल केंद्र शासनाने घेतली. ही योजना फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता याचा फायदा संपूर्ण देशातल्या लोकांना झाला पाहिजे ही भूमिका केंद्र सरकारने घेतली ही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे. वर्धा जिल्हयातील नागरिकांना आज स्वामित्व योजनेअंतर्गत मिळकत पत्रिका मिळाली असून स्वामित्व योजना ही नागरिकांच्या आर्थिक सुरक्षेची हमीच आहे असे प्रतिपादन राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. यासाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभारही मानले. स्वामित्व योजनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या जमिनीच्या सीमांचे निर्धारण होऊन मालकी हक्काची सनद मिळाली आहे. यामुळे जमिनीशी संबंधित वाद त्वरित निकाली लागतील, असे प्रतिपादन गडचिरोली चे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी केले. प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते सनद वाटप कार्यक्रमाचे थेट प्रसारण गडचिरोली मध्ये करण्यात आले.पंतप्रधान स्वामित्व योजना ग्रामीण भागातील जमिनींचे सर्वेक्षण आणि मॅपिंग करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरत असून स्वामित्व योजनेच्या माध्यमातून आज देशातील ५० लाखांहून अधिक घरमालकांना मिळकत सनदेचे ई-वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते

आभासी पद्धतीने करण्यात आले. अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सनद वाटप कार्यक्रमात कळमेश्वर येथील लाभार्थ्यांना प्रातीनिधिक स्वरूपात सनद वितरीत करण्यात आली. स्वामित्व योजनेतून ग्रामीण जनजीवनाला बळकटी मिळेल, असे मत अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी व्यक्त केले. अमरावती जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हास्तरीय स्वामित्व योजनेतून सनद वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

---------------------------

मन की बात

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशविदेशात राहणाऱ्या भारतीयांसमोर आपले विचार मांडणार आहेत.हा या कार्यक्रमाचा एकशे अठरावा (११८) भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या तसंच ए आय आर चे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲप वरून प्रसारित केला जाणार आहे. त्याशिवाय हा कार्यक्रम एआयआर न्यूज, डीडी न्यूज,पंतप्रधान कार्यलय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवरूनही थेट प्रसारित केला जाणार आहे.

---------------------------

लाडकी बहीण

राज्यातल्या जवळपास ४ हजार अपात्र महिलांनी लाडकीबहीण योजनेतून माघार घेतली असल्याची माहिती महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. गेल्या महिन्यात शंभर-दीडशे अर्ज आले होते. तर उर्वरित अर्ज या महिन्यात आल्याचं तटकरे म्हणाल्या. या महिलांनी परत केलेले पैसे विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरले जाणार आहेत. तक्रारप्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी सुरू आहे. जानेवारी महिन्याचे पैसे लाभार्थ्यांना २६ जानेवारी पूर्वी दिले जातील, असंही त्यांनी सांगितलं.

---------------------------

आशिष शेलार

गड किल्ल्यांवरील अतिक्रमण का�ण्यासाठी आणि रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती गठित केल्याची माहिती महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी आज दिली. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातले किल्ले आणि गडावर अतिक्रमण होत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं होतं. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार ही समिती गठित करण्यात आली आहे.

---------------------------

अश्विनी वैष्णव-फडणवीस

मुंबईकरांचा प्रवास सुसह्य करण्यासाठी एक सर्वसमावेशक मंच विकसित केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

*माननीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवजी यांच्या नेतृत्वात मुंबईच्या ट्रान्स्पोर्टेशनचा सिंगल प्लॅटफॉर्म आम्ही तयार केलेला आहे. आतापर्यंत मेट्रो बेस्ट असे सगळे आपले ट्रान्सपोर्ट सिस्टीम आपण प्लॅटफॉर्मवर आणले होते. आपले सबर्बन रेल्वेदेखील त्याच्या गरजेचं होतं कारण ती आपली मुंबईची लाईफलाईन आहे. आज त्यालाही मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे आता मुंबईच्या लोकांना सगळ्या ट्रान्सपोर्टेशन सिस्टम, एका प्लॅटफोर्मवर एका तिकीटावर त्या ठिकाणी वापरता येतील. देशाचे प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या स्वप्नामध्ये ज्या प्रकारचं पब्लिक ट्रांसपोर्ट आहे त्या प्रकारचा इंटिग्रेशन करण्याची सुरुवात आज आम्ही या ठिकाणी केली आहे.*

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देखील महाराष्ट्रात होत असलेल्या पायाभूत सुविधा या मधील गुंतवणुकीबद्दल यावेळी माहिती दिली

*आज जो इनिशिएटिव ले रहे हैं, ये हमारे मुख्यमंत्री जी का बहुत बड़ा इनिशिएटिव है कि मुंबई तक को इस तरह से एक सुविधा है। मैं केवल उसमें दो चीजें जोड़ना चाहूंगा। मुंबई में जो लोकल ट्रेन्स हैं, इसमें आज करीब करीब साढ़े 3000 सर्विसेज इसको कम से कम 10% एक्स्ट्रा बढ़ाने के लिए 300 सर्विसेज एक्स्ट्रा बढ़ाने के लिए 17,100 करोड़ का इन्वेस्टमेंट रेलवे अभी कर रही है और पूरे महाराष्ट्र में रेलवे का इन्वेस्टमेंट अभी 1,70,000 करोड़ का है।)*

या ॲप्लिकेशनवर लोकांना आपल्या प्रवासाची आखणी करता येईल, तसंच सर्वात जवळचं स्थानक आणि प्रवासाच्या साधनाची माहितीही आर्टिफिशल इंटेलिजन्सद्वारे त्यांना मिळू शकेल. या मंचाद्वारे लाखो मुंबईकरांचा प्रवास सुकर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

---------------------------

पशुआहार शास्त्र परिषद

महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाच्या पशुआहार शास्त्र विभागातर्फे तसच पशुआहार शास्त्र संघटना (बरेली) च्या संयुक्त विद्यमान जागतिक पशु आहार शास्त्र परिषद (WANACON-2025) आणि भव्य प्रदर्शनीच आयोजन महाविद्यालयात दिनांक 20 ते 22 जानेवारी दरम्यान करण्यात आल आहे. या परिषदेमध्ये हवामान बदलाचा परिणाम, पशुपोषणात होणारे बदल, तसच उपजीविकेच साधन म्हणून पशुपालन या विषयांवर

महत्त्वपूर्ण चर्चा होणार आहेत. यामध्ये देशभरातील नामांकित संस्थांचे शास्त्रज्ञ, कृषी आणि पशुवैद्यक विद्यापीठांमधील प्रतिनिधी, तसच भारतीय कृषी संशोधन संस्थेतील तज्ञ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ असे 500 हून अधिक शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, उद्योग प्रतिनिधी, पशुवैद्यक, पशुपालक आणि पदव्युत्तर विद्यार्थी सहभागी होणार असून अमेरिकेतून कॉर्नेल विद्यापीठाचे प्राध्यापक जोसेफ मॅकफेडन, श्वान आहार तज्ञ डॉ.अविनाश देशमुख, कुक्कुट आहार तज्ञ डॉक्टर अजय भोयर यांसोबतच फ्रान्समधील उंट आहार शास्त्रज्ञ डॉ. बर्नार्ड फाये, कुक्कुट पालन तज्ञ आणि सार्कचे प्रतिनिधी डॉ.युनुस अली आणि इथिओपियाचे कृषी महासंचालक डॉ. कदिये यांचा समावेश आहे. यात विविध संशोधन आणि तांत्रिक विषयांच सादरीकरण, महत्त्वाच्या विषयांवर चर्चासत्र, शास्त्रज्ञ-उद्योग-शेतकरी संवाद सत्र, तसच पशु पोषण प्रदर्शनी (फीड टेक एक्सपो) चा समावेश असेल. या तीन दिवसीय परिषदेच्या माध्यमातून पशु पोषण आणि पशु उत्पादन क्षेत्रातील विकासाला चालना देणारी अद्यावत माहिती उपलब्ध होईल. परिषदेच उद्घाटन 20 जानेवारी रोजी होणार असून त्याकरिता महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते होईल.

----------------------------

जस्टा कॉझा

तरुणांमध्ये अफाट ऊर्जा असून 'युथ पार्लमेंट' जीवनात दिशादर्शक ठरेल, अस प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे राज्यपाल नामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड यांनी केल. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या वतीन विधान भवन इथं आज राष्ट्रीय युवा संसदेच आयोजन करण्यात आल. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बनसोड मार्गदर्शन करीत होते. भारतीय युवा काय आहे, हे जगाला दाखवत युवा जगाचा चेहरा बदलेल, अस प्रतिपादन माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी केल. विद्यार्थी हेच देशाचे पु□चे नेतृत्व असून राजकीय क्षेत्रातील प्रतिमा बदलण्याच मोठ आव्हान तसच संधी तुमच्याकडे आहे. सर्व बदलायच असेल तर बदल स्वतःपासून करावा लागेल. बदल घडविण्यासाठी युथ पार्लमेंट महत्त्वपूर्ण माध्यम आहे. बदल घडविण्यासाठी या सभागृहातून प्रेरणा घेण्याच आवाहन डॉ. बोकारे यांनी केल. महाविद्यालयाच्या शताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विधान भवन मिळवून दिल्यान प्राचार्य डॉ. मोर यांच कुलगुरूंनी अभिनंदन केल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या वतीन 'जस्टा क्वाजा' या राष्ट्रीय विधी महोत्सवाच्या निमित्तान महाराष्ट्र विधान भवन इथं आयोजित युवा संसद ऐतिहासिक ठरली. महिला

सुरक्षा आणि बांग्लादेश येथील अल्पसंख्याकांची सुरक्षा आदी दोन विषयावरील महत्त्वपूर्ण विधेयकं युवा संसदेत मांडण्यात आली.

-----------------------------

हवामान

विदर्भात आज नागपूर आणि गडचिरोली इथं सर्वात कमी 14 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. गोंदिया इथं 14 पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. गेले काही दिवस सर्वत्र □गाळ वातावरण असल्यामुळे किमान तापमानात वा□ झाली होती. आता विदर्भात सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमान दोन ते तीन अंशांनी घसरलं असून किमान तापमान 14 ते 15 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

-----------------------------